डोराचे पुस्तक




लेखन व चित्रः मिशैल एडवर्डस्
मराठी: अश्विनी बर्वे

डोराचे पुस्तक



डोराचे पुस्तक



लेखन व चित्रः मिशैल एडवर्डस्
मराठी: अश्विनी बर्वे





वैलरी लिवेसची आठवण,

जी एक चांगली मैत्रीण आणि शेजारी आहे.




उत्तर मिनेसोटामध्ये जिथे प्रचंड थंडी असते, तिथे डोरा नावाची एक वृद्ध स्त्री राहत असे. जेव्हा दिवस लहान होत आणि गार हवा वाहत असे तेव्हा डोरा घर आतून गरम ठेवण्याचा स्वतः प्रयत्न करे. ती आपल्या आवडती दुलई पांघरून पडून राहत असे. डोराला आपली आजी मॉली आणि आजोबा मैक्स यांच्याबद्दल विचार करायला आवडत असे.



एका रात्री जेवण झाल्यावर डोराने ठरवले की ती अजून म्हातारी आणि विसराळू होण्याच्या आधी तिला आपले आजी आजोबा जसे राहत होते, त्या सगळ्याच्या बद्दल तिला जे आठवते ते तिने लिहायचे.

डोराने लिहले की मॅक्स आजोबा कसे समोरच्या अंगणातून ओकच्या झाडाच्या फांद्या कापून आणि घासून मॉली आजीसाठी लोकर विणण्याच्या सुया तयार करत असत.







ती म्हणाली की मॉली आजी आपल्या खुर्चीवर बसून कधी उलटा तर कधी सुलटा टाका विणत सगळ्यासाठी स्वेटर, टोपी, आणि मफलर विणत असी. ज्यांना ती ओळखत होती त्या सगळ्यांसाठी काही ना काही विणे.




उसने बताया कि दादी मॉली अपने स्ट्रूडल (मीठा पकवान) के लिए लोई को कागज़ जितना पतला बेला करती थी।



आणि मॅक्स आजोबा फर्निचर तयार करण्यासाठी लाकडाला रंधा मारत आणि हातोड्याने खिळे ठोकत.



हिवाळाभर डोरा लिहित राहिली, लिहित राहिली, लिहित राहिली. तिच्या शब्दात तिच्या आठवणींचे योग्य वर्णन लिहता यावे यासाठी ती प्रयत्न करत राहिली. पण काही गोष्टी अशा ओट्या, जशा की मॉली आजीचे हसू किंवा मैक्स आजोबांची दाढ़ी ज्यासाठी चित्राची आवश्यकता होती.



म्हणून डोराने वसंतात आपली पेन्सिल काढली आणि चित्र काढू लागली. ती काढे आणि पुसून टाके, परत काढे आणि पुसून टाके. तिने मॉली आणि मैक्सचे चित्र काढले.






तिने हिवाळ्यात त्यांच्या घराचे चित्र काढले, जेव्हा बाहेर बर्फाचा ढीग असे आणि उन्हाळ्यात बागेत टोमॅटो आणि द्राक्षे लगडलेली असत.



तिने त्यांच्या बैठकीचे चित्र काढले ज्यात मैक्स आजोबांनी वाचण्यासाठी केलेली खुर्ची होती आणि मॉली आजीची लोकरीचे गुंडे होते. डोराने त्यांच्या स्वयंपाकघराचे चित्र काढले ज्यात त्यांची मोठी काळी शेगडी होती.



उन्हाळ्यात डोराने आपले चित्र पूर्ण केले. तिने आपली सर्व चित्रं आणि कहाण्यांचा गठ्ठा केला आणि त्या दाखवण्यासाठी आपला मित्र टॉमकडे घेऊन गेली.

''टॉम मला वाटते की माझ्याकडे एक पुस्तक आहे,'' डोरा म्हणाली.

टॉम एक मुद्रक होता, म्हणजे तो पुस्तक छापण्याचे काम करत असे. त्याच्या तळघरात एक जुने मशीन होते आणि सगळीकडे धातूचे तुकडे पडलेले होते, ज्यावर अक्षरे कोरलेली होती. तो या तुकड्यांना 'टाइप' म्हणत असे.



''तुझे जुने छपाई मशीनने माझे पुस्तक छापले जाईल का?'' डोराने विचारले.

''नक्कीच,पण काही अटी पूर्ण झाल्या तर,'' टॉम म्हणाला. ''मी या जुन्या मशीनवर अनेक पुस्तके छापली आहेत. पण आपण आधी तुझी चित्रे शहरात एक खास जागी पाठवू. ते लोक चित्र धातूवर छापून देतील. मग उठावाच्या साहय्याने ते सुद्धा अक्षराच्या सारखे छापले जाऊ शकेल. तेव्हा मी तुझी चित्र पण छपाई मशीनने छापू शकेन.''

जेव्हा धातुवर चित्रं बनून आली तेव्हा ते डोराच्या चित्रासारखीच होती फक्त उलटी होती.




''लाजवाब,'' टॉम म्हणाला. "ही अशीच पाहिजे होती."

तेव्हा टॉमने डोराला दाखवले की टाईपचे पान बनवण्यासाठी कसे रचले जाते.



त्याने धातूने बनवलेल्या अक्षरांना एका एका खाचेतून काढले, त्यामुळे डोराच्या कहाणीतले शब्द करू शकणार होता.

अक्षर अन अक्षर, शब्द अन शब्द, वाक्य अन वाक्य, जोड़त त्यांनी एक एक पान तयार केले. काही पानांवर त्यांनी धातूचे चित्र आणि काही शब्द बसवले. पण डोराने बघितले की प्रत्येक पानावर प्रत्येक गोष्ट उलटी होती.




''सुरेख,'' टॉमने पहिले पान बघत म्हटले. "हे असेच हवे होते.

''फक्त एक गोष्ट सोडून ...'' डोरा म्हणाली. "आजीचे नाव मॉली होते, पॉली नाही.'' प्रत्येक पानावरच्या चुका शोधून काढण्याची जबाबदारी होती.



जेव्हा टॉमने सर्व चुका सुधारल्या, पाने छपाईसाठी तयार होते. पुस्तक कागदाच्या छोट्या पानांवर छापले जानवर होते. ज्यावर प्रत्येक पानावर चार पाने छापले जाऊ शकत होते. दोन कागदाच्या समोरच्या भागावर अजून दोन छापले गेले.




टॉमने आपला शाईचा चाकू ओल्या काळ्या शाईच्या डब्यात घातला आणि मग शाई छपाई मशीनवर असलेल्या रोलरवर पसरवली.



खटाक, खटाक, खटाक! टॉमने छपाई मशीनला फिरवले आणि रोलर धातुवरच्या अक्षरांना आणि चित्रांना फिरवले. जो भाग उठावदार होता ते शाईने भरले. मग कागदाला शाईच्या ठशांनी अक्षरे आणि चित्रांना जोराने दाबले. पहिले पान छापले गेले.

जब टॉम ने कागज़ उठाया वह धातु से बने पन्ने-सा ही था, बस अब अक्षर और चित्र उलटे नहीं थे।



''सुंदर,'' डोरा म्हणाली. "आता सगळे जसे आहे तसे दिसायला पाहिजे."

एक एक पान करत टॉमने डोराची सर्व चित्रे आणि कहाण्या छापल्या.




डोराने पण मदत केली. तिने टॉमसाठी चहा आणि आजीच्या पद्धतीने तयार केलेली पेस्ट्री आणली.




जेव्हा सर्व पाने छापली गेली, टॉमच्या तळघरात चारी बाजूला छापलेल्या कागदाचे ढीग होते.

“आता यांना एकत्र बांधायचे आहे,” टॉम म्हणाला.




टॉम आणि डोराने सर्व पानांची आधी घडी केली आणि मग त्यांना योग्य क्रमाने लावले. तेव्हा पुस्तकाचे एक-एक पान शिवले गेले. पहिल्या आणि शेवटच्या पानावर सुंदर हिरवा कागद चिटकवला गेला. त्यांना पुस्तकाची शेवटची पाने म्हटले जाते.



पुस्तक लवकर तयार व्हावे म्हणून टॉमने जाड पुठ्ठ्याचे तुकडे कापले आणि पुस्तकाच्या पाठीसाठी लाल पट्ट्या कापल्या.




डोराने हिरवा कापड कापून प्रत्येक पुठ्ठ्यावर चिटकवला.





जेव्हा खळ तयार झाली टॉम आणि डोराने तिच्या साहय्याने शेवटचे कागद चिटकवले आणि मग पुस्तक दाबण्याच्या यंत्राखाली ठेवले. जेव्हा डिंक पूर्णपणे वाळला तेव्हा पुस्तक तयार झाले.



"एवढं वाईट पण नाही डोरा," टॉमने डोराचे एक पुस्तक हातात घेत म्हटले.



"हे तर खूप सुंदर आहे!" डोराने आनंदाने डोलत म्हटले.

"पण ही तर खूप पुस्तके आहेत डोरा," टॉमने म्हटले.

"या पुस्तकांचे काय करणार आहे?"



"एक मोठी मेजवानी देईन आणि ही पुस्तके वाटून टाकेन," डोराने उत्तर दिले.

डोराने फरशी पुसायला, कपड्याच्या आणि कागदाच्या चिंध्या फेकण्यास टॉमला मदत केली.




मग दोघांनी मिळून वापरलेले सर्व टाईप स्वच्छ केले आणि त्यांना खाचेत ठेवले. टॉमने डोराची धातुवर कोरलेली चित्रे साफ केली आणि सावधपणे कागदात बांधून दिले. डोरा ते सहज सांभाळून ठेवू शकेल. मग टॉम आणि डोराने पुस्तकांना डोराच्या हातगाडीवर ठेवली आणि मग डोरा ती घरी घेऊन गेली.





दुसऱ्या दिवशी डोराने एक मोठी पेस्ट्री तयार केली आणि आपल्या शेगडीवर अनेक लिटर चहा तयार केला. तिने आपल्या मित्रांना आणि शेजाऱ्यांना मेजवानीत सहभाग घेण्यासाठी बोलावले.



टॉम सगळ्यात सन्मानीय अतिथी होता.







डोराने प्रत्येकाला एक एक पुस्तक दिले.
प्रत्येक पुस्तकावर तिने काहीतरी खास लिहून दिले.

माझी शेजारी मिसेज़ लेवीला,

आजी आपला गोठा प्रत्येकवर्षी पांढऱ्या रंगाने रंगवत असे.
फक्त त्या वर्षी तिने गुलाबी रंगाने रंगवले, माझ्या गोठ्यसारखे.
डोरा एम. स्केल

चित्रकार





माझा सहकारी माळी स्मिथीला,

आशा आहे तुम्हाला आजोबांचे बागेतले सल्ले
आवडतील.आजोबांचा दावा होता की मिससिपिच्या याबाजूला
त्यांचे जैविक खाद्य सगळ्यात चांगले होते.
डोरा एम. स्केल
बागवान

माझी प्रेमळ मैत्रीण बैटीला,

या घे काही पदार्थ तयार करण्याच्या कृती, ज्या तू
मागितल्या होत्या पण मी देऊ शकले नव्हते.
स्ट्राबैरी जॅमचे रहस्य आहे एक कप जास्त साखर.
डोरा एम. स्केल
सुगरण



जेव्हा मेजवानी स्म्प्लीम डोराच्या जवळ फक्त दोन पुस्तके शिल्लक होती. डोराने एक आपल्यासाठी ठेवले आणि दुसरे टॉमसाठी ठेवले. टॉमच्या पुस्तकावर डोराने लिहले:

टॉमला,

जो चांगला दोस्त, आणि उत्तम छपाई करणारा आहे.

डोरा एम. स्केल





१८००च्या मध्याच्या आधी पुस्तके अशीच छापली जात होती जशी टॉम आणि डोराने छापली होती. अर्थात काही लोक अजूनही हाताने पुस्तके तयार करतात. अधिकतर पुस्तके मशीनवर तयार होतात.

हातांनी पुस्तके तयार करण्याच्या कलेबाबतचे तांत्रिक सूचनासाठी मिशैल एडवर्डस्, मिनिसोटा सेंटर फॉर बुक आर्टस्च्या कार्यकर्त्यांचे आभार माणू इच्छिते.

